# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी
सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा स्थूल आराखडा

## ''वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांची आत्मचरित्रे : एक चिकित्सक अभ्यास

विशेष संदर्भ : अरुण लिमये, विनोदिनी गायकवाड, हिम्मतराव बावस्कर, प्रकाश आमटे, अभय बंग, किशोर शांताबाई काळे, वि.ना.श्रीखंडे, सुलोचना सोमण, रवींद्रनाथ टोणगावकर, अलका मांडके''


**संशोधक**

**अनिल नाथराव बडगुजर**

एम.ए.(मराठी, इतिहास) बी.एड. सेट

**मार्गदर्शक**

डॉ. केशव सखाराम देशमुख

प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड


**जून २०१७**

## ''वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांची आत्मचरित्रे : एक चिकित्सक अभ्यास

### प्रस्तावना

कथा, कादंबरी, चरित्र आणि आत्मचरित्र हे कथनात्म वाङ्मयप्रकार आहेत. स्वतःच्या जीवनाचे स्वतः केलेले वस्तुकथन म्हणजे आत्मचरित्र होय. कथा, कादंबरी लेखनासाठी कल्पित कथानक तयार करावे लागते. आत्मचरित्रात कल्पकतेला वाव नाही. लेखक स्वतःचे जीवनानुभव, दुःख, संघर्ष, कर्तृत्व सांगण्यासाठी, या वाङ्मयप्रकाराची निवड करतो. पण वस्तुनिष्ठपणे लिहिलेले आत्मचरित्रे समीक्षकांसाठी अभ्यासाचा विषय ठरतात. मराठीत कथा, कादंबरीपेक्षा आत्मचरित्रांची संख्या कमी आहे. कारण एक लेखक अनेक कथा,कादंबऱ्या लिहू शकतो. पण एक व्यक्ती एकदाच आत्मचरित्र लिहू शकते. आत्मचरित्रात स्वतःचे अनुभव, आत्मकार्य कथन करणे सोपे आहे. परंतु स्वतःचे दोष, चूका प्रामाणिकपणे मांडण्याची तटस्थ वृत्ती लेखकाजवळ असावी लागते. तरच आत्मचरित्र श्रेष्ठ ठरते. जेव्हा एखादा साहित्यिक आत्मचरित्र लिहितो, कारण त्याच्याकडे प्रतिभाशक्ती असते. त्याचा पिंड लेखकाचा असतो. पण समाजातील कोणतीही व्यक्ती आत्मचरित्र लिहू शकते. तेव्हा तो चर्चेचा विषय ठरतो. कारण त्यामागची प्रेरणा व उद्दिष्ट्ये महत्वाची असतात. स्वतःच्या जीवनवृत्तांताबरोबर माझ्यासारख्या व्यक्तीने समाजासाठी काय केले, हे सांगणे आत्मचरित्राचे उद्दिष्ट आहे. म्हणून आज सार्वजनिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात आत्मचरित्रे लिहिली जात आहेत. ती वाङ्मयीनदृष्ट्या महत्वाची आहेत. यामध्ये राजकीय पुढारी, उद्योजक, चित्रपट सृष्टीतील नट-नट्या, कलावंत, समाजसेवक, शिक्षणक्षेत्रांतील व्यक्ती व वैद्यकीय क्षेत्रांतील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांचा समावेश होतो.

१९६० नंतर ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी वाङ्मयप्रवाहाने मराठी साहित्य प्रभावित केले. परिणामी कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र व आत्मचरित्रांची संख्या वाढली. त्यामुळे मराठी साहित्याला नवीन आयाम प्राप्त झाले. यात दलित आत्मकथनांनी तर वाचकांना मंत्रमुग्धच केले. कारण दुःख, कष्ट, उपासमार, अपमान, सोशिकता यांचे दाहक चित्रण त्यात होते. आणि ते सत्य होते. म्हणून समीक्षकांनी त्याचा शोध घेतला. ऊहापोह केला. परंतु सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या लेखकांच्या आत्मचरित्राकडे दुर्लक्ष झाले. ही आत्मचरित्रे वाचनीय व अभ्यासनीय आहेत. त्यात वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांचा विशेष उल्लेख करता येईल.

# प्रकरण मांडणी

## प्रकरण पहिले : प्रास्ताविक

### संशोधन विषयाची निवड

१९६० नंतर वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांनी आत्मचरित्रे लेखनाला सुरुवात केली. ती प्रसिध्दही झाली. त्याआधीच्या आत्मचरित्रांचाही शोध घ्यायचा आहे. डॉक्टर हा समाजातील एक प्रतिष्ठित वर्ग आहे. समाज अपेक्षेने त्यांच्याकडे पाहतो. कारण वैद्यकीय क्षेत्र हे सेवाक्षेत्र आहे. पण आजच्या बहुतांश डॉक्टारांचा कल धनसंचयाकडेच जास्त आहे. परंतु आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून समाजसेवा करणारे डॉक्टर चर्चेचा विषय बनतात. संपूर्ण जीवनच समाजासाठी समर्पित करणारे डॉक्टर तर ईश्वरच वाटतो. म्हणून त्यांनी लिहिलेली आत्मचरित्रे समाजासाठी प्रेरणादायी आहेत. व या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तिला सामाजिक भान व जाण आणून देणारी आहेत. म्हणून ही आत्मचरित्रे अभ्यासासाठी निवडली आहेत. वाचन व लेखन यासाठी डॉक्टरांना स्वतःच्या व्यवसायामुळे वेळ मिळत नाही. तरीपण त्यांनी केलेले लेखन सामाजिक व वाङ्मयीनदृष्ट्या महत्वाचे आहे. डॉक्टरांच्या आत्मचरित्र लेखनामागची प्रेरणा, काळ, त्यातील प्रादेशिक चित्रण, निवेदनशैली, भाषा व रुग्णालयातील वातावरण या गोष्टी वाचकांसाठी नवीन आहेत. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेऊनही मराठी भाषेत लेखन करणे. हे भाषेबदलचे प्रेम व साहित्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन महत्वाचा आहे. यांचा अभ्यास मराठी वाङ्मयात नवा अध्याय ठरेल. असे वाटते.

१९७८ ला डॉ. अरुण लिमये यांचे 'क्लोरोफॉर्म' नावाचे आत्मचरित्र प्रसिध्द झाले. त्यांच्यावर वैद्यकीय नीतीचा भंग केला. अशी आवाजवी टीका झाली. तरीपण डॉक्टरांचे आत्मचरित्र लिहिणे थांबले नाही. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील संघर्ष व सत्यता समाजाला माहित झाली. कोल्हाट्याचं पोर, प्रकाशवाटा ही आत्मचरित्रे वाचकांना अनेकवेळा रडवतात. अत्यंत दुर्गम भागात जाऊन काम करणारे डॉ. प्रकाश आमटे यांचे कार्य व संघर्ष वाचकांना थक्क करतो. तर भटक्या जमातीत जन्म झाला. नावामागे वडिलांचे नाव नाही. म्हणून आईचे नाव लाऊन डॉक्टरकीचे स्वप्न साकार करणारे डॉ. किशोर शांताबाई काळे यांची कथा समाजव्यवस्थेला आव्हान देणारी आहे. म्हणून अशा वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांच्या एकत्रित अभ्यासामुळे या क्षेत्रातील नैतीक मूल्यांची जोपासना होईल. व डॉक्टरांच्या सामाजीक दृष्टीकोनाचे स्वरुप व प्रेरणांचा शोध घेण्यासाठी हा विषय निवडला आहे.

### १. गृहीतके

संशोधन कार्यात परिकल्पना किंवा गृहीतकांना महत्वाचे स्थान असते. मुख्यत्वेकरुन संशोधनकार्याचा आरंभच गृहीतकांपासून होतो. म्हणून वैद्यकीय क्षेत्रांतील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांचा अभ्यास करत असताना पुढील गृहीतके डोळ्यांसमोर ठेवली आहेत.

१. संशोधनाकरीता निवडलेल्या डॉक्टरांच्या आत्मचरित्रांत सामाजिक जाणिवा अभिव्यक्त झालेल्या आहेत.

२. वैद्यकीय क्षेत्रांतील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांत प्रादेशिकता हे वैशिष्ट्ये प्रकर्षाने जाणवते.
३. वैद्यकीय क्षेत्रांतील जीवन संघर्षाच्या अभिव्यक्तीतून ही आत्मचरित्रे लिहिली आहेत.
४. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांत भाषिक वेगळेपण प्रकर्षाने जाणवते
५. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांवर तत्कालीन काळ, परिस्थिती व प्रदेशाचा प्रभाव होता.

## २. संशोधनाची उद्दिष्ट्ये

वैद्यकीय क्षेत्रांतील डॉक्टरांची आत्मचरित्रे वैविध्यपूर्ण आहेत. त्याचा अभ्यास करत असताना पुढील उद्दिष्ट्ये विचाराधीन आहेत.

१. वैद्यकीय क्षेत्रांतील डॉक्टरांच्या आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणांचा शोध घेणे.
२. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील सामाजिक दृष्टिकोनाचे स्वरुप उलगडून दाखविणे.
३. निवेदनशैली आणि भाषेच्या अंगाने डॉक्टरांच्या आत्मचरित्रांचा अभ्यास करणे.
४. वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील प्रादेशिकतेचा शोध घेणे.
५. वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांचा जीवन संघर्ष स्पष्ट करणे.
६. वैद्यकीय व्यवसायाबरोबरच त्यांनी जोपासलेली वाङ्मयीन दृष्टीचा शोध घेणे.

## ३. संशोधनाची व्याप्ती

'वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांची आत्मचरित्रे : एक चिकित्सक अभ्यास' या शीर्षकाखाली पुढील निवडक दहा आत्मचरित्रांचा अभ्यास करण्यात येईल. क्लोरोफॉर्म (अरुण लिमये), बॅरिस्टरचं कार्ट (हिम्मतराव बावस्कर), यशस्विनी (विनोदिनी गायकवाड), अनुभव (सुलोचना सोमण), कोल्हाट्याचं पोरं (किशोर शांताबाई काळे), प्रकाशवाटा (प्रकाश आमटे) माझा साक्षत्कारी ऱ्हदयरोग (अभय बंग), आणि दोन हात (वि.ना. श्रीखंडे) दोंडाईच्याचा डॉक्टर (रवींद्रनाथ टोणगावकर) हृदयस्थ (अलका मांडके)

## ४. संशोधनपध्दती

वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांचा अभ्यास करण्यासाठी विविध समीक्षापध्दतीचा व संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. यामध्ये समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय व तुलनात्मक या समीक्षा पध्दती सोबतच मुलाखत, चर्चात्मक, संदर्भग्रंथ, प्रश्नावली, विश्लेषणात्मक व ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग संशोधन कार्य सुलभ आणि दर्जेदार होण्यासाठी करण्यात येणार आहे.

## ५.      संशोधनाची उपयुक्तता

संशोधन हे समाजोपयोगी, समाजहितकारक, आणि समाजात सकारात्मक बदल घडविणारे असावे. या दृष्टिनेच हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे. आत्मचरित्रे एकाचवेळी वैयक्तिक आणि सामाजिक अशा उभय बाजूंनी साकार होतात. लेखकाचा जीवनपट, त्यांचा जीवनसंघर्ष, त्याचा प्रांत, समाजदर्शन आणि या पद्धतींचे नानाविध पैलू हे आत्मचरित्रासारख्या वाङ्मयप्रकारांची जमेची बाजू असते. शिवाय भाषिकदृष्ट्या प्रायः बोलीदृष्टिनेही आत्मचरित्रांचे निराळेपण लक्षणीय ठरु शकते. याला जोडूनच डॉक्टरांची वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित असणारी एक परिभाषा. अशा भाषेचीही सरमिसळ याप्रकारच्या लेखनांत येत असते. म्हणूनच समाज आणि साहित्य यासंदर्भातही हे संशोधन वेगळे ठरु पहाणारे आहे. आत्मचरित्र हा वाङ्मयाचा एक प्रकार आहे. त्याचा विद्यापीठ स्तरावर पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमात समावेश असतोच. त्यामुळे आत्मचरित्रांची संकल्पना व स्वरुपाचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे. डॉक्टरी पेशा हा सेवा क्षेत्रातील महत्त्वाचा पेशा आहे. तेव्हा हा व्यवसाय सेवाभावाने केलातरच आनंद निर्माण करणारा आहे. माझ्या संशोधनाचा उपयोग नव्याने होणाऱ्या डॉक्टरांसाठी ही उपयुक्त ठरणार आहे. भारतामध्ये आजही आपण रोगावर १०० टक्के नियंत्रण मिळवू शकलो नाही. सामाजिक बांधिलकी, समजतूदारपणा ,संवेदनशीलता आदी मूल्ये रुजविण्यासाठी संशोधन उपयोगाचे ठरेल असा विश्वास वाटतो.

# प्रकरण दुसरे : आत्मचरित्राची संकल्पना आणि स्वरुप

## प्रस्तावना

आत्मचरित्र हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे. इंग्रजी राजवटीच्या अंमदानीत तो मराठीत जन्मला आणि वाढला. पाश्चात्य समीक्षकांनी चरित्राचाच एक भाग म्हणून आत्मचरित्रांची समीक्षा केली. मराठी वाङ्म-येतिहासाच्या ग्रंथात लेखकांनी चरित्राचाच उपप्रकार म्हणून आत्मचरित्रांचा आढावा घेतला. १९७० नंतर आत्मचरित्रांची संख्या मराठीत वाढली. त्यामुळे समीक्षकांना स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून मान्य करावे लागले. त्यानंतर आत्मचरित्र लेखानाचे तंत्र आणि आकृतिबंध यांचा शोध सुरु झाला. Autobiography या इंग्रजी शब्दासाठी मराठीत आत्मचरित्र हा शब्द वापरला जातो. आत्मचरित्र म्हणजे स्वतःच स्वतःच्या जीवनाचे केलेले वस्तुकथन होय. लेखक स्वतःचे अनुभव, दुःख, जीवनसंघर्ष आणि कर्त्कृत्व सांगण्यासाठी या वाङ्मयप्रकाराची निवड करतो. मराठीत आत्मपर लेखनाची परंपरा सापडते. संतांनी चांगले आत्मपर अभंग, ओव्या लिहिल्या आहेत. पण आत्मचरित्र संकल्पनेचा उगम कुठे व कसा झाला व मराठीत ही संकल्पना कशी आली. याचा शोध घेणे. आणि आत्मचरित्रांचे स्वरुप आणि वाटचालीचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल. त्यासाठी पुढील मुद्दे विचाराधीन असतील.

१. आत्मचरित्र म्हणजे काय?
२. आत्मचरित्राची संकल्पना
३. आत्मचरित्राचे स्वरुप
४. आत्मचरित्रांची वाटचाल
५. निष्कर्ष

## प्रकरण तिसरे

## वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील सामाजिक दृष्टिकोन

### प्रस्तावना

वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांत सामाजिक दृष्टिकोनाचे दर्शन घडते. वैद्यकीय क्षेत्र हे सेवाक्षेत्र आहे. समाजसेवा हे सूत्र डोळ्यासमोर ठेवूनच कोणतीही व्यक्ती या व्यवसायात पदार्पण करते. हे सूत्र प्रस्तुत डॉक्टरांच्या आत्मचरित्रात आढळते. परंतु या व्यवसायातून धनसंचय करणे, याकडेच आजच्या बहुतांश डॉक्टरांचा कल दिसून येतो. प्रस्तुत संशोधन आत्मचरित्रातील डॉक्टर ग्रामीण, आदिवासी अशा सर्व भागात जाऊन काम करणारी मंडळी आहे. ही डॉक्टर मंडळी आर्थिक दृष्टिकोनातून पैशाला प्राधान्य देत नाही. तसेच शारिरीक दृष्टिकोनातून वेळप्रसंगी स्वतःच रक्तदान करण्यासही तत्पर असतात. हा दृष्टिकोन या आत्मचरित्रांचा वेगळा ठरतो. थेट जगण्याशी असणारा डॉक्टरांचा संबंध त्यांना देवत्व प्राप्त करुन देतो. कारण सामान्य माणसाबद्दल असलेली त्यांची तळमळ आणि मी जर नाही, केले तर रुग्ण दगावेल म्हणून मीच केले पाहिजे. ही त्यांची वृत्ती सामाजिक दृष्टिकोनाला दृढ करते. या गोष्टी प्रस्तुत आत्मचरित्रांत जागोजागी पहावयास मिळतात. म्हणून डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील सामाजिक दृष्टिकोन हा वाङ्मयाला नवा आयाम प्राप्त करुन देतो. त्यामुळे त्यांचा शोध या प्रकरणात घ्यायचे निश्चित केले आहे. त्यासाठी खालील मुद्यांचा अभ्यास करण्यात येईल.

१. सामाजिक दृष्टिकोनाची संकल्पना
२. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील सामाजिक दृष्टिकोनाचे स्वरुप
३. निष्कर्ष

## प्रकरण चौथे

## वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांची निवेदनशैली आणि भाषिक वेगळेपण

### प्रस्तावना

आत्मचरित्रात खुद्द लेखकच स्वतःच्या गतजीवनाची कथा स्वतःच निवेदन करतो. म्हणून निवेदनशैली ही लेखकाच्या व्यक्तिमत्वानुरुप बदलते. लेखक ज्या काळ, परिस्थिती व प्रदेशात जगला आणि वाढला, त्यांचाही परिणाम निवेदनशैलीवर होतो. प्रस्तुत डॉक्टरांच्या आत्मचरित्रांची निवेदनशैली ही वेगळ्या प्रकारची आहे. तसेच त्यांन कुठलीही वाङ्मयीन, सांस्कृतिक पूर्वपार्श्वभूमी नसताना हे निर्माण केले. या मुद्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. डॉक्टर्स ज्या समाजातून, ज्या परिसरातून आले, तेथील समाजभाषा आणि शिक्षण तसेच संघर्ष करताना वा यश संपादन करताना त्या व्यवसायाची एक परिभाषा, असा एकसंध भाषापरिपोष या आत्मचरित्रांमधून जाणवत राहातो. या अशा भाषिक वेगळेपणाचाही वेध घ्यावयाचा आहे.

तसेच, प्रस्तुत या प्रकरणात निवडलेल्या आत्मचरित्रांच्या भाषिक वेगळेपणाचाही शोध घेण्यात येणार आहे. भाषा ही संवादाचे, संपर्काचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. भाषेचा, भाषेतील संस्कारांचा प्रभाव हा प्रत्येक व्यक्तिवर कळत नकळत होत असतो.

प्रस्तुत आत्मचरित्रांतील डॉक्टरांच्या व्यक्तिमत्वावर त्यांच्या निवेदनशैलीवर ते ज्या-ज्या प्रदेशात वावरले त्या प्रदेशातील बोलीभाषेचा प्रभाव हा प्रकर्षाने जाणवतो, त्या भाषिक वेगळेपणाचा शोध घेतांना, पुढील मुद्दे महत्वाचे वाटतात.

१. प्रस्तावना
२. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांची निवेदनशैली.
३. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांचे भाषिक वेगळेपण
४. डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील म्हणी व वाक्प्रचार
५. वैद्यकीय परिभाषा
६. निष्कर्ष

## प्रकरण पाचवे

# वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील प्रादेशिकता

### प्रस्तावना

प्रादेशिकता हे वाङ्मयाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रादेशिक कादंबऱ्या असा स्वतंत्र अभ्यास मराठी साहित्यात झाला आहे. आत्मचरित्रातील प्रादेशिकता असाही स्वतंत्र अभ्यास करता येईल. येथे डॉक्टरांच्या आत्मचरित्रांतील प्रादेशिकतेचा शोध घ्यायचा आहे. कारण ही डॉक्टर मंडळी एकाच प्रदेशातील नाही. तर कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र अशा विविध ठिकाणी त्यांनी काम केले आहे. त्या-या ठिकाणची माणसं, त्यांची भाषा. तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक जीवनाचे प्रतिबिंब या आत्मचरित्रांत पडले आहे. त्यांचा शोध या प्रकरणात मुद्देसूदपणे घेण्यात येणार आहे.

१. प्रस्तावना
२. प्रादेशिकतेची संकल्पना
३. आत्मचरित्रातील प्रादेशिकता : पूर्व पार्श्वभूमी
४. डॉक्टरांच्या आत्मचरित्रातील प्रादेशिकतेचे स्वरुप
५. निष्कर्ष

# प्रकरण सहावे

# वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांच्या जीवनसंघर्षाचे स्वरुप

## प्रस्तावना

प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात संघर्ष हा असतोच. त्याचे स्वरुप वेगळे असते. जीवनात यशस्वी झालेली प्रत्येक व्यक्ती ही जीवनातील संकटांना धैर्याने, जिद्दीने, संयमाने सामोरे गेलेली असते. जीवन संघर्ष जितका मोठा. तितके त्याचे व्यक्तिमत्वही संपन्न व समृध्द बनत असते. असा जीवन संघर्ष संशोधनासाठी निवडलेल्या डॉक्टरांच्या आत्मचरित्रातही, त्यांच्या जीवनातही आढळतो. याच जीवनसंघर्षाच्या स्वरुपाचा शोध या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

हा शोध घेताना संशोधनासाठी निवडलेल्या आत्मचरित्रातील डॉक्टरांचा सामाजिक जीवन संघर्ष, शैक्षणिक जीवनसंघर्ष, व्यावसायिक जीवनसंघर्ष, आर्थिक जीवनसंघर्ष या मुद्यांच्या आधारे जीवनसंघर्षाचे स्वरुप अभ्यासून शेवटी निष्कर्षांची मांडणी करण्यात येणार आहे.

## अभ्यासासाठी निवडलेली आत्मचरित्रे

१. क्लोरोफॉर्म , डॉ. अरुण लिमये , ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, आ. चौथी - मार्च २०११

२. बॅरिस्टरचं कार्ट, डॉ. हिम्मतराव बावस्कर , मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई आ. दुसरी जून २००५

३. यशस्विनी, डॉ. विनोदिनी गायकवाड, निर्मल प्रकाशन, नांदेड आ. प्रथम ऑक्टोंबर १९८८

४. अनुभव, डॉ. सुलोचना सोमण, मौज प्रकाशन, मुंबई

५. कोल्हाट्याचं पोरं, किशोर शांताबाई काळे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई आ. पुनर्मुद्रण सप्टेंबर २००८

६. प्रकाशवाटा, डॉ प्रकाश आमटे, समकालीन प्रकाशन, पुणे आ. एकविसावी नोव्हेंबर २००९

७. माझा साक्षात्कारी हृदयरोग, डॉ. अभय बंग, राजहंस प्रकाशन, पुणे आ. एकविसवी डिसेंबर २०१६

८. दोंडाईच्याचा डॉक्टर, डॉ. रवींद्रनाथ टोणगावकर, मनोविकास प्रकाशन आ. प्रथम एप्रिल २०१६ पुणे

९. आणि दोन हात, डॉ. वि.ना.श्रीखंडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई आ. तिसरी सप्टेंबर २००९

१०. हृदयस्थ, डॉ अलका मांडके, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, आ. अठरावी नोव्हेंबर २००९

## संदर्भ ग्रंथसूची


१. आत्मचरित्रमीमांसा, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-आ. प्रथम फेब्रुवारी १९९८

२. चरित्र-आत्मचरित्र, प्रा. अ.म. जोशी - स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे-आ. तृतीय. एप्रिल १९९९

३. चरित्र आणि आत्मचरित्र डॉ. सदा कऱ्हाडे - लोकवाङ्मय गृह, मुंबई

४. चरित्र-चिंतन, द.न. गोखले- मौज प्रकाशन गृह, मुंबई आ. प्रथम जानेवारी २०००

५. शैली वैज्ञानिक समीक्षा, डॉ. रमेश धोंगडे - दिलीपराज प्रकाशन, पुणे आ. प्रथम ऑगस्ट १९९६

६. साहित्याचा संसार, प्रा. ब.ग. खापर्डे - साधना प्रेस, पुणे (पटवर्धन) आ. प्रथम फेब्रुवारी १९६२

७. आजचे मराठी साहित्य, (सं.) डॉ. आशा सावदेकर, साहित्य प्रसार केंद्र आ. प्रथम १९९५

८. साहित्य : शोध आणि संवाद, (सं.) डॉ. मनोहर जाधव, सुविधा प्रकाशन आ. प्रथम २००५ पुणे

९. प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा डॉ. रेखा जगनाळे, विजय प्रकाशन नागपुर

१०. १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.

११. प्रदक्षिणा खंड १ व २, अ.म.जोशी, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण, २००७

१२. आत्मचरित्र : आत्मकथन, वाङ्मयीन रुपबंध, रामचंद्र काळुंखे मे. जून २०१४ नव अनुष्टुभ (नियतकालिक)



**संशोधक**
**अनिल नाथराव बडगुजर**
एम.ए.(मराठी, इतिहास) बी.एड. सेट

**मार्गदर्शक**
**डॉ. केशव सखाराम देशमुख**
प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड